**Celebration of Ecofriendly Dasara**
**21/10/2023**

# विवेकानंदमध्ये पर्यावरणपूरक दसरा साजरा



**कोल्हापूर** : एक झाड म्हणजे जैवविविधतेचे भांडार असते. अशा जैवविविधतेच्या भांडाराचे संवर्धन व जतन करण्यासाठी यावर्षी दसऱ्याचे औचित्य साधून विवेकानंद महविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागात पर्यावरणपूरक दसरा साजरा करण्यात आला.

आपट्याच्या झाडाच्या पानांऐवजी रद्दी पेपर, जुन्या लग्नपत्रिका, जुनी भेट कार्ड व नैसर्गिक रंगाचा वापर करुन आपटयाच्या पानाच्या आकाराची पर्यावरणपूरक पाने तयार केली असून त्यावर पर्यावरण व वृक्ष संवर्धनाचे संदेश लिहिले आहेत. या पानांचे वैशिष्ट्य म्हणजे पान बनवताना त्यामध्ये वापरण्यात आलेल्या वेगवेगळया प्रकारच्या बिया. ही पाने कुठेही पडली तरी त्यामधून नवीन झाडेच तयार होतील. पारंपरिक सणांची कास धरुन पर्यावरणपूरक सण साजरे करुन जनजागृती व्हावी या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

दसऱ्यादिवशी आपण आपट्यांची पाने वाटतो. ही पाने हाती सोपवत असताना सोने घ्या, सोन्यासारखे राहा अशा शुभेच्छा देतो. दसऱ्याच्या निमित्ताने अलीकडील काळात आपट्याबरोबर कांचन, सुवर्णकांचन इत्यादी झाडांची बेसुमार तोड होत आहे. परिणामी त्यांची संख्या कमी होत चालली आहे. बेसुमार तोडलेल्या पानांचे कचऱ्यांमध्ये रुपांतर होते. काही जण तर आपट्यांच्या पानांना जाळून टाकतात.

कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे उदघाटन गणित विभाग प्रमुख प्रा. एस. पी. थोरात यांच्या हस्ते झाले. प्रास्ताविक वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. बी. टी. दांगट यांनी केले. सुत्रसंचालन विद्यार्थिनी सृष्टी कांबळे व आराधना मराठे यांनी केले. या कार्यक्रमासाठी वनस्पतीशास्त्र विभागातील प्राध्यापक, विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
(Empowered Autonomous)
ESTD
JUNE
1964